जनजाती क्षेत्र उपयोजना/जनजाती क्षेत्राबाहेरील उपयोजना

२००६-२००७ चे जिल्हानिहाय व योजनानिहाय अर्थसंकल्पीय तरतुदीचे वाटप "नगर विकास"

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्र.बीयुडी-२००६/प्र.क्र.१०/का.७**
**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :- १५ सप्टेंबर, २००६.**

**वाचा :** १) वित्त विभाग, परिपत्रक क्र.अंदाज-१०.०६/सीआर-४७/२००६/अर्थसंकल्प-३, दि. ५ मे, २००६.

**शासन निर्णय :-** आदिवासी उपयोजनांतर्गत "नगर विकास" या उपशिर्षाखाली २००६-२००७ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात समाविष्ट करण्यात आलेल्या तरतुदीचे व योजनांचे जिल्हावार वाटप आणि प्रत्येक योजनांचे अंमलबजावणी अधिकारी सोबत जोडलेल्या विवरणपत्रात दर्शविले आहेत.

२. महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) अधिनियम २००६ (सन २००६ चा अधिनियम क्रमांक ११) हा तरतूदीच्या वितरणास पारित झाला असल्यामुळे शासन आता जनजाती क्षेत्र उपयोजनेखालील "नगर विकास" या उपशिर्षाखालील योजनांना सोबतच्या विवरण पत्रातील स्तंभ क्र.२ मध्ये दर्शविलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीच्या वितरणास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच ती रक्कम स्तंभ क्रमांक ३ मध्ये दर्शविलेल्या अंमजबजावणी अधिका-यांच्या अधिनस्त ठेवण्यास मंजूरी देत आहे.

३. अंमलबजावणी अधिकारी आणि विभागप्रमुख यांनी ही तरतुद शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.टिएसपी-१०८६/८७१०/प्र.क्र.३१/का.५ दिनांक ९.३.१९९० अन्वये निश्चित केलेल्या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील व क्षेत्राबाहेरील मान्य कार्यक्रमांवर/योजनांवर खर्च होतील याची दक्षता घ्यावी. तसेच या तरतूदींमधून प्रत्यक्ष आदिवासींना लाभदायक ठरतील अशी कामे नगरपालिका क्षेत्रातील आदिवासी वस्ती/ कॉलनी किंवा आदिवासी बहुल असलेल्या लोकवस्तीमध्ये घेण्यात यावीत. तसेच अशी कामे अंतिम करतांना त्या प्रस्तावास संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांची मंजूरी घेण्यात यावी. तसेच या तरतूदी खर्च करतांना शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.टिएसपी-२००३/प्र.क्र.१०१/का-६, दिनांक २६ जुलै, २००४ व टिएसपी-२००५/प्र.क्र.५९/का-६, दिनांक १० नोव्हेंबर, २००५ मधील अटींचे कटाक्षाने पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी तसेच प्रस्तुत शासन निर्णयाद्वारे वितरित करण्यात येत असलेल्या तरतूदी मासिक खर्च विवरणपत्राप्रमाणे (Cash Flow) खर्च करण्याची दक्षता सर्व नियंत्रक अधिका-यांनी घ्यावी.

४. अंमलबजावणी अधिकारी व विभागप्रमुख यांनी मुख्य आदिवासी उपयोजना क्षेत्रात आणि अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल. याची दक्षता घ्यावी जेणेकरुन शासनाला मुख्य आदिवासी उपयोजना क्षेत्रातील खर्चावर लक्ष ठेवता येईल आणि तो केंद्र शासनाला कळविता येईल.

५.	सर्व अंमजबजावणी /नियंत्रण अधिका-यांनी योजनावार मासिक खर्चाची विवरणे मुख्य आदिवासी क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी व आदिवासी क्षेत्राबाहेरील क्षेत्रासाठी स्वतंत्रपणे विहीत प्रपत्रात ज्या महिन्यात खर्च झाला असेल त्याच्या पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत या विभागास, नियोजन विभाग, वित्त विभाग व इतर संबंधित प्रशासकीय विभाग व आदिवासी विकास, आयुक्त यांचे कार्यालय, नाशिक यांना पाठवाव्यात.

६.	अंमलबजावणी अधिकारी/विभाग प्रमुख यांनी नियम प्रचलित कार्यपध्दती व सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन चालू योजनांवर खर्च करावा. हे आदेश फक्त अंमलबजावणी/नियंत्रक अधिका-यांच्या अधिनस्त ठेवलेल्या तरतुद प्रशासकीय मान्यता दिलेल्या चालू योजनांवर खर्च करण्यासाठी आहे. याची अंमलबजावणी अधिका-यांनी नोंद घ्यावी.

७.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००६०९१५१६५४२८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( वि.रा.ठाकूर )
**कार्यासन अधिकारी**

**प्रति,**

आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/नागपूर/ठाणे/अमरावती.
विभागीय आयुक्त, मुंबई/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती/पुणे.
जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, अमरावती/ यवतमाळ/ नांदेड/ ठाणे/ नंदुरबार.
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, आदिवासी विकास, अमरावती/यवतमाळ/नांदेड/ठाणे /नंदुरबार.
प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार/शहापूर/डहाणू, जि.ठाणे, पांढरकवडा, जि.यवतमाळ, धारणी, जि.अमरावती, किनवट, जि.नांदेड, नंदुरबार, जि.नंदुरबार.
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.(प्रत्येकी ५ प्रती)
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई. / नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
कार्यासन अधिकारी का.क्र. २, ६, १२ व १७ आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,मुंबई.
संचालक, नगर रचना, पुणे (बजेट ३ प्रती )
उपसंचालक, नगर रचना कोकण डिव्हीजन्स नवी मुंबई/अमरावती विभाग, अमरावती /नाशिक विभाग, नाशिक/ औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
निवड नस्ती (का-७)

## जनजाती क्षेत्र उपयोजनेखालील २००६-२००७ चे जिल्हानिहाय अंदाजपत्रकीय तरतूदीचे वाटप (टि.एस.पी.)

**शिर्ष :-** नगर विकास

**योजनेचे नांव :-** विकास योजना कार्यान्वित करण्यासाठी नगरपालिकांना वित्त सहाय्य (आदिवासी क्षेत्र)

**(रुपये हजारात)**

**मागणी क्रमांक :- टी -** ५

**मुख्य लेखाशिर्ष :-** २२१७-नगर विकास-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-जनजाती क्षेत्र उपयोजना- ८०-सर्वसाधारण- १९१-स्थानिक संस्था, महानगर पालिका, नगर विकास प्राधिकरण नगर सुधार मंडळ इ. ना सहाय्य (०१) विकास योजना कार्यान्वित करण्यासाठी नगरपालिकांना वित्तीय सहाय्य.
(००) (०१) राज्य योजनांतर्गत योजना (२२१७ ०२८१)

| जिल्हयाचे नांव | | २००६-२००७ साठी केलेली पूरक तरतूद | २००६-२००७ ची अर्थसंकल्पीय तरतूद सुर्पूद करण्यात आलेला नियंत्रक अधिकारी | प्रशासकीय विभाग | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ४ | ५ |
| जिल्हा | नगरपरिषदेचे नांव | | संचालक, नगर रचना, पुणे. | नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई | सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय यांनी तरतुदीचे संबंधितांस तात्काळ वितरण करुन तसे या विभागास कळवावे. |
| ठाणे | डहाणू/जव्हार | ४३२० | | | |
| नंदुरबार | नंदुरबार/तळोदे/ नवापूर | ११०० | | | |
| अमरावती | चिखलदरा | ६४४ | | | |
| यवतमाळ | पांढरकवडा | ९१७ | | | |
| नांदेड | किनवट | ४०० | | | |
| **एकुण** | | **७३८१** | | | |